**सं.फौ.ख.नं.१००५/२०१९**

**सखुबाई वि. संतोष व इतर**

**निशाणी क्र. १८ लगत**

**फिर्यादीचा उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्रीमती एस.डी.बाबर यांचे मार्फत शपथेवर सुरु –**

२. हे म्हणणे खरे आहे की, मी कांबळेश्वर येथे राहते. माझे घर आरोपींच्या घरापासून तीन ते साडेतीन किमी अंतरावर आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी गट क्र.२२ हा आरोपींच्या कब्जे वहिवाटीस आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी आरोपी गट क्र.२२ वहिवाटत आहे. मला सांगता येणार नाही की, मुदत खरेदीची मुदत ही कधी संपली आहे. मला सांगता येणार नाही की, मी आरोपीला र.रु.८०,०००/– निश्चीत कोणत्या तारखेला दिले. मी आरोपीला र.रु.८०,०००/– दिले होते हे दाखवण्याकरीता माझ्याकडे कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीच्या भावाला व्याजाने पैसे दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी सावकारकीचा व्यवसाय करते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या मालकीच्या शेतातील मी माती चोरुन नेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीच्या शेतातील दोन तीन डंपर माती काढली होती. मला गालावर चापट मारली त्यामुळे गालावर व्रण उटले होते. मी त्यानंतर शेंडे डॉक्टरांकडे उपचारासाठी गेले होते. मी त्यांना सदरचे व्रण दाखवले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी शेंडे डॉक्टरांचे तपासणीचे प्रमाणपत्र घेतलेले नाही. सदरची घटना ही तास दिड तास चालली होती. मला आठवत नाही की, मी घटनेनंतर पोलिस स्टेशनला किती वाजता गेली होती. हे म्हणणे खरे आहे की, कांबळेश्वर ते साखरवाडी २० किमी किंवा त्यापेक्षा जास्त अंतर आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला मी कधीही उसनवार पैसे दिलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला त्रास देण्यासाठी मी सदरची खोटी तक्रार दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगत असल्याप्रमाणे कोणतीही मारहाणीची घटना घडली नाही.

३. हे म्हणणे खरे नाही की, दि.१४.१२.२०१८ रोजी गट क्र.६२ मध्ये सायंकाळी ५.०० वाजताचे सुमारास घटना घडली, त्यावेळी मी सदर गटामध्ये

ट्रॅक्टर घेवून गेले होते, आरोपीने ट्रॅक्टरवाल्यास नांगरणी करण्यास हरकत केली, मी आरोपीला विचारले असता त्याने मला शिवीगाळ केली, माझ्या गालावर चापट मारुन मला ढकलून दिले, त्यावेळी दादा माने तेथे हजर होते इ. मजकूर मी खोटा कथन करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

फलटण. (ए.एस.साटोटे)

ता.३०.०७.२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, फलटण.

(न्यायालय क्र.३)